Quadrant II- Transcript

Programme: Bachelor of Arts (First Year)

Subject: Marathi

Paper Title: Communication Skill Comparing

Unit: 02

Module Name: सूत्रसंचालनात सुभाषिते व म्हणींचा वापर

Module No: 02

Name of the Presenter: Ms. Chaitali Koli

---

Transcript

- नमस्कार. उच्च शिक्षिण संचालनालयाच्या वतीने शिक्षण सामग्री प्रकल्पाच्या अंतरगत कला शाखेच्या पदवी शिक्षणासाठी मराठी विषयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सूत्रसंचालन या विषयावर आपण आज शिकून घेऊया.सूत्रसंचालनात सुभाषितांचा वापर कसा करायचा त्याचबरोबर सूत्रसंचालनात म्हणींचा वापर कसा करायचा हे दोन विषय आज आपण पाहणार आहोत. याची उद्दिष्ट्ये बघुया. सुभाषित आणि म्हणी म्हणजे काय याचे तुम्हाला आकलन होईल.विविध सुभाषितांचा व म्हणींचा तुम्हाला अर्थ समजेल.सूत्रसंचालनात सुभाषितांचा आणि म्हणींचा

वापर कसा करायचा हे तुम्ही समजून घ्याल. प्रत्यक्षात सूत्रसंचालन करताना सुभाषितांचा आणि म्हणींचा वापर तुम्ही करु शकाल.

- सगळ्यात आदी समजून घेऊया सुभाषित म्हणजे काय ? थोड्या शब्दात मोठा आशय सांगणे म्हणजे सुभाषित. एका ओळीत एकादे तत्व किंवा सत्य मांडलेले असते. काही सुभाषितांचे चार चरणही असतात. काही सुभाषितांचे दोन चरणही असतात. सूत्रसंचालनात सुत्रसंचालक मराठी त्याचबरोबर संस्कृत अशा दोन्ही भाषेतील सुभाषितांचा वापर करु शकतो. सुभाषितांचा वापर सूत्रसंचालनात कसा करावा हे पुढील उदाहरणाच्या माध्यमातून आपण समजून घेऊया. महाविद्यालयात अनेक कार्यक्रम होत असतात. प्रथम वर्षाच्या मुलांसाठी स्वागताचा कार्यक्रम महाविद्यालयातर्फे आयोजित केला जातो. अशा कार्यक्रमात पुढील सुभाषिताचा वापर तुम्ही करु शकता.

- मित्र संग्रहणे बलं संपाद्यते । याचा अर्थ आहे मित्रांचा संग्रह केला म्हणजे बलाची वृध्दी होते. याचा अर्थ काय आहे ? महाविद्यालयात प्रवेश घेताना अभ्यास हे आपले लक्ष असतेच पण अभ्यासाव्यतिरिक्त चांगल्या मित्रांचा संग्रह

केल्यास आत्मिक बलाची वृध्दी होत असते हा संदेश तुम्ही या सुभाषिताचा वापर करुन त्या नवीन विद्यार्थ्यांना देऊ शकतात. तसेच पुढील सुभाषिताचा वापर संदर्भानुसार अशा कार्यक्रमात किंवा दहावी- बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी केलेल्या निरोप समारंभाच्या वेळी तुम्ही करु शकतात.

- क्षणशः कणशः चैव विद्यामंर्थच साधयेत् । क्षणः त्यागे कुतो विद्या कणः त्यागे कुतो धनम् ।। याचा अर्थ आहे एकेक क्षण गाठी बाधून विद्या मिळवावी. एकही क्षण वाया गेला तर कोठली विद्या. विद्या नसेल तर धन ही मिळत नाही. तसेच दहावी - बारावीच्या मुलांसाठी आयोजित केलेल्या मार्गदर्शनपर कार्यक्रमात पुढील सुभाषिताचा तुम्ही वापर करु शकता.

- उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः। न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः। याचा अर्थ काय आहे ते समजून घेऊया. परिश्रम केल्याने कार्यसिध्दी होते. केवळ स्वप्नरंजन करुन भागत नाही. झोपलेल्या सिंहाच्या तोंडात हरिणे प्रवेश करीत नाहीत. त्यालाही भक्ष्य मिळविण्यासाठी परिश्रम करावे लागतात. तसेच तुम्हीही परिश्रम नकरता

चांगल्या गुणांची अपेक्षा कली तर ते बरोबर नाही. तुम्ही चांगला अभ्यास कराल तर तुम्हाला चांगले गुण मिळतील.

- विद्यारुपी धन देणारा म्हणजे गुरु . जो आपल्याला विद्या देतो त्याला आपण गुरु असे म्हणतो. अशा गुरुंसाठी गुरुपोर्णिमेच्या दिवशी अनेक विद्यालयात विद्यार्थीवर्ग कार्यक्रम आयोजित करत असतात. अशा सोहळ्याच्या वेळी सूत्रसंचालन करताना संदर्भानुसार तुम्ही सुभाषिताचा वापर करु शकता. न चोरहार्य न च राजाहार्य न भ्रातृभाज्यं न च भारकारि ।व्यये कृते वर्धत एव नित्यं विद्याधनं सर्वधनप्रधानम् ।। या सुभाषिताचा वापर तुम्ही गुरुपोर्णिमेच्या दिवशी करु शकतात. याचा अर्थ असा आहे, चोर जे चोरु शकत नाही, राजा ज्याचे हरण करु शकत नाही, भाव- भावात जे वाटता येत नाही आणि ज्याचे ओझे होत नाही, जे खर्चले असता सतत वाढतच जाते असे जे विद्यारुपी धन, ते सर्व धनात सर्वश्रेष्ठ आहे.

- मातृ दिन आता हल्ली खुप साजरा केला जातो. मातृ दिन साजरा करताना पुढील सुभाषिताचा वापर तुम्ही करु शकता.सर्वेषां एव शापानां प्रतिघातो हि विद्यते। न तु

मात्राभिशप्तानां मोक्षः क्रश्र्चन विद्यते।। याचा अर्थ आहे सर्व शापांपासून मुक्तता आहे, परंतु आईने दिलेल्या शापापासून कसलीही मुक्तता नाही.

- मैत्री दिवस साजरा करताना पुढील सुभाषिताचा वापर तुम्ही करु शकता. दर्शने स्पर्शने वापि श्रवणे भाषणेपि वा। यस्त्र द्रवत्यन्तरंगं स स्नेह इति कथ्यते।। याचा अर्थ आहे जेव्हा एखाद्या माणसाच्या भेटीने , स्पर्शाने, किंवा बोलण्याने अन्तःकरण भरुन येते त्याला मैत्री म्हणावे. अशीच अजून काही सुभाषिते अर्थासह देत आहे. त्यांचा वापर तुम्ही संदर्भानुसार सूत्रसंचालनात करुन घेऊ शकता.
- प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे .याचा अर्थ आहे कोणतेही काम हे अशक्य नसते. कोणतेही काम करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करणे महत्वाचे आहे. तुम्ही मेहनत कराल तर तुम्हाला यश नक्कीच मिळेल.
- केल्याने होत आहे रे। आधी केलेची पाहिजे याचा अर्थ आहे कोणतेही कार्य हाती घेतल्याने ते पूर्ण होतेच. कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी आदी तुम्ही कृती तरी करायला हवी. तुम्ही काहीच करत नाही, बसल्या बसल्या आपल काम

व्हायला हवं असं तुम्हाला वाटत असेल, तर के कधीच होणार नाही. काम होण्यासाठी तुम्ही काहीतरी कृती करायला हवी.

- माझ्या मराठीची बोलू कौतुके। परी अमृतातही पैजेजी जिंके याचा अर्थ आहे, मराठी भाषेचे किती कौतुक करु. मराठी भाषा संस्कृत सारख्या भाषेच्या तोडीची व तेवढीच समृध्द आहे.

- जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले। तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा। याचा सुंदर अर्थ आहे तो म्हणजे एखाद्या गरजू, उपेक्षित व्यक्तीला जो माणूस आपलस करतो, त्याची काळजी घेतो तोच साधू. अशाच माणसांच्या ठाई देवत्वाची प्रचीती आपल्याला येते.

- सूत्रसंचालनात म्हणींचा वापर कसा करावा हे आता आपण पाहूया.

- "म्हण" हे नाम "म्हणणें" ह्यापासून निघालेले आहे. म्हण ह्या शब्दाचा अर्थ "लोकांनी वारंवार म्हटलेले किंवा उच्चारलेले जे वाक्य ते". म्हण ह्याची शास्त्रीय व्याख्या पुढीलप्रमाणे आहे. "ज्यांत काही अनुभव, उपदेश, माहिती, सार्वकालिक सत्य किंवा ज्ञान गोविलेले आहे, जे अल्पशब्दात्मक आहे, ज्यांत

काही चटकदारपणा आहे आणि लोकसंभाषणांत वगैरे जें वारंवार योजतात, असे वचन किंवा वाक्य". अल्पशब्दात्मक म्हणजे कमी शब्दाचे. म्हण तीन शब्दात सुध्दा असू शकते. चार शब्दात सुध्दा असू शकते. याला म्हण असे म्हणतात. या व्याख्ये वरुन तुम्हाला म्हण या शब्दाचा अर्थ समजलाच असेल. तर प्रत्यक्षात म्हणींचा वापर आपण सूत्रसंचालनामध्ये कसा करु शकतो हे आपण काही उदाहरणांच्या माध्यमातून पाहूया.

- उथळ पाण्याला खळखळाट फार- याचा अर्थ आहे, ज्याच्या अंगी विध्दत्तेचा किंवा दुसरा कोणत्याही प्रकारचा गुण नसतो, तो बढाई फार मारतो. खरोखरी गुणी माणुस बढाई मारीत नाही. ह्यालाच तुम्ही धरुन पुढे म्हणू शकतात की जसे की आमचे प्रमुख पाहुणे.... स्वतःच्या क्षेत्रात इतरांपेक्षा श्रेष्ठ असूनही आपण किती श्रेष्ठ आहोत याचे त्यांनी कधिच प्रदर्शन मांडलेले नाही. आणि नंतर तुम्ही त्यांच नाव घेऊ शकतात.
- आचार भ्रष्टी सदा कष्टी- याचा अर्थ आहे, ज्याचे आचार विचार चांगले नसतात, तो नेहमी दुःखी असतो. एखाद्या भक्तिपर किंवा संत साहित्यावर आयोजित केलेल्या

कार्यक्रमात अशा म्हणीचा संदर्भानुसार व प्रसंगानुसार तुम्ही वापर करायला हवा.

- काठी मारल्याने पाणी दुभंगत नाही- याचा अर्थ आहे, खऱ्या मैत्रीचा भंग आगंतुक कारणांनी होऊ शकत नाही. मैत्री दिवस साजरा करत असताना सूत्रसंचालकाने या म्हणीचा वापर सुंदर पध्दतीने संदर्भानुसार करावा.
- मूर्ती छोटी पण किंती महान- एखाद्या महान व्यक्तीच्या कतृत्वासंबंधी आपण या म्हणीचा वापर करु शकतो.
- मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही याचा अर्थ, अनुभवातून आपण शिकत असतो. शालेय जीवनात विविध स्पर्धात्मक कार्यक्रम होत असतात. अशा कार्यक्रमांत अनेक वेळा बक्षिस नमिळाल्याने विद्यार्थ्यांचे मनोबल खाली जाण्याची शक्यता असते. अशा वेळी वरील म्हणीचा वापर सूत्रसंचालनात करुन सूत्रसंचालक विद्यार्थ्यांच्या मनात सकारात्मक विचारांची पेरणी करु शकतो. कार्यक्रम पत्रिका काय आहे तसेच वेळ, प्रसंग पाहून अशा अनेक म्हणींचा वापर सूत्रसंचालनात सूत्रसंचालक करु शकतो.

- पुढील काही म्हणी अर्थासह देत आहे. संदर्भानुसार तुम्ही त्यांचा वापर करुन घ्यावा. अति शहाणा त्याचा बैल रिकामा- जो माणूस फार शहाणपणा करायला जातो, त्याचे मुळीच काम होत नाही.
- आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास- मुळातच आळशी माणसाच्या आळशी वृत्तीला पोषक अवस्था निर्माण होते.
- इच्छा तेथे मार्ग- एखादी गोष्ट करण्याची इच्छा असेल तर काहीतरी मार्ग निघतोच.
- उस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये- कोणत्याही चांगल्या गोष्टीचा किंवा एखाद्याच्या चांगुलपणाचा प्रमाणाबाहेर फायदा घेऊ नये.
- करावे तसे भरावे- जसे कृत्य असेल त्याप्रमाणे चांगलेवाईट फळ भोगावे लागते.
- अशा वेगवेगळ्या म्हणींसाठी ‘मराठी भाषेचे वाक्प्रचार व म्हणी’ रचनाकार विद्याधर वामन भिडे यांच्या पुस्तकाचा तुम्ही वापर करा.

- म्हणींचे आणि सुभाषितांचे महत्वाचे मुद्दे बघा. श्रोता वर्ग लक्षात घेऊन सुभाषितांचा वापर सूत्रसंचालनात करावा. उपस्थितांना समजेल अशाच सुभाषितांचा वापर करावा. संस्कृत सुभाषिताचा वापर करत असल्यास शक्यतो लहान सुभाषित निवडावे. सुभाषिताचा अर्थ श्रोत्यांना समजला असेल तर उत्तम. अर्थ समजला नसेल तर सुभाषितांचा अर्थ सांगणे महत्वाचे. मनोरंजनात्मक पध्दतीने मोलाचे मार्गदर्शन करणे हा हेतू सुभाषितांचा वापर करताना असावा. सुभाषिते वाचण्यास सराव करणे महत्वाचे जेणेकरुन प्रस्तुतिकरण सुंदर होते. म्हणींचा वापर करताना उपस्थितांच्या भावना दुखावल्या जाऊ नये याची तुम्ही काळजी घ्यायला हवी. सूत्रसंचालन बोजड वाटत असेल तर मध्येच एखाद्या म्हणीचा वापर करुन श्रोत्यांचे मनोरंजन करण्याचा तुम्ही प्रयत्न करावा. भाषेवर प्रभुत्व असावे. म्हणी लहान असल्याने पुन्हा - पुन्हा त्यांचा वापर करु नये. सुभाषितांचा आणि म्हणींचा वापर करताना तारतंम्य राखणे फार महत्वाचे आहे.
- ही काही संदर्भासाठी पुस्तके आहे. अतिरिक्त माहितीसाठी तुम्ही ह्या संदर्भाच्या पुस्तकांचा वापर करु शकता. आज

आपण म्हणी आणि सुभाषिते यांचा वापर सूत्रसंचालनामध्ये कसा करावा हे पाहिलेले आहे. तुम्ही अतिरिक्त माहितीसाठी या पुस्तकांचा संदर्भ घ्या. आणि सूत्रसंचालनामध्ये त्यांचा वापर करा. धन्यवाद.